REVIEWS OF LITERATURE
ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 3.3754(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 7 | FEBRUARY - 2018


# मराठी विज्ञान कादंबरीची संकल्पना

प्रा. प्रविणसिहं बहादूरसिंह शिलेदार
सहा.प्राध्यापक, मराठी विभाग , देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

**प्रस्तावना :**

मराठी वाड्.मयाच्या इतिहासात 1960 नंतर मोठ्या प्रमाणात बदल झाला. या बदलाला साहित्यातील क्रांती असे म्हटले जाते. हा बदल विविध प्रवाहांच्या माध्यमातून होत होता. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी इत्यादी वाड्.मयीन प्रवाह निर्माण झाले. याचा अर्थ या विविध प्रकारच्या वाड्.मयीन प्रवाहांमध्ये 1960 पूर्वी लेखन होत नव्हते असे नाही पण एका जाणीवेच्या स्वरूपात, चळवळीच्या स्वरूपाचे लेखन 1960 नंतर घडू लागले. याच प्रवाहामध्ये आनखी एका नव्या प्रवाहाची भर पडली ती म्हणजे 'विज्ञान साहित्य प्रवाह' होय. इंग्रजीमध्ये ज्याला 'सायन्स फिक्शन' म्हणतात त्याला मराठीत 'विज्ञान साहित्य' असे म्हटले जाते. सायन्स फिक्शन या संज्ञेला मराठीत पर्याय म्हणून विज्ञानसाहित्य हे नाव स्विकारले गेले. हे नाव मराठी विज्ञान परिषद आणि मंबई विद्यापीठाचा मराठी विभाग यांनी प्रथम स्वीकारले. (विज्ञान साहित्य आणि संकल्पना संपा. डॉ. व. दि. कुलकर्णी, निरंजन घाटे पृ. 81) आणि आज ते नाव मराठीत पूर्णपणे रूळलेले आहे. साहित्य ही संज्ञा सर्जनशील साहित्य या अर्थाने वापरली आहे. काव्य, कथा, कादंबरी, नाटक हे सर्व प्रकार यात समाविष्ट होतात. सर्जनशील साहित्यकृती ही सदैव स्वतंत्र, स्वयंपूर्ण आणि परिपूर्ण कृती असते. आणि असायला पाहिजे. या अर्थाने विज्ञान साहित्यसूध्दा स्वतंत्र, स्वयंपूंर्ण आणि परिपूर्ण कृती आहे. विज्ञान साहित्याचा ज्ञानदान हा दुय्यम हेतू आहे. तर त्याचा मूळ हेतू इतर साहित्य प्रकारांप्रमाणे आनंद देणे हाच आहे. तशाच प्रकारे इतर साहित्य प्रकारांप्रमाणे मराठी विज्ञानसाहित्याचा मूख्य केंद्र मानव आहे. हे साहित्य विज्ञानाच्या प्रगतीचा मानवावर काय परिणाम होतो याचे चित्रन करते.

मराठी विज्ञान साहित्याची सुरूवात विसाव्या शतकापासून झाली. त्यावेळेस तिच्यावर पाश्चात्य विज्ञान साहित्याचा प्रभाव होता. तिने ख–या अर्थाने बाळसे 1980 नंतर धरले. कारण या काळात प्रामुख्याने डॉ. जयंत नारळीकरांनी केलेले लेखन होय. नारळीकर हे भारत देशातील मोठे संशोधक आहेत. अशा एका महान संशोधकाने मराठीत विज्ञान कथा आणि कादंबरी लेखन करने म्हणजेच या वाड्.मय प्रकाराचे महत्त्व लक्षात येते. डॉ. नारळीकरांच्या लेखनामुळे हा लेखन प्रकार बालकथा, भयकथा, किंवा गूढकथा नसून ती विज्ञानकथाच आहे हे सिध्द झाले. या बद्दल निरंजन घाटे म्हणतात. "इतके दिवस दुर्लक्षित ठरलेली विज्ञानकथा ऊच्चभ्रू दिवाणखान्यात आली, वाचली गेली की नाही हे सांगणं अवघड आहे. नारळीकर लिहायला लागल्यामुळं आणखी एक गोष्ट घडली. ती म्हणजे मराठीत विज्ञानकथेच समीक्षणही होऊ लागलं. साहित्यसम्मेलनांतून विज्ञानकथांचा उल्लेख होऊ लागला."( तत्रैव पृ. 51) नारळीकरांच्या लेखनाने ख–या अर्थाने यावर चर्चा होऊ लागली. अनेक वृत्तपत्रे मासिकांतून या विषयावर लेख प्रसिध्द होऊ लागले. याचा अर्थ नारळीकरांच्या आधी नारायण धारप, भागवत, वि. दा. घाटे यांनी लिहिलेल्या कादंब–याना महत्त्व नव्हते असे नाही. पण नारळीकरांचे एक स्थान, एक पोझिशन, त्यांचे व्यक्तिमत्त्व एक वेगळ्या प्रकारचे असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना या त्यांच्या लेखनाचे विशेष महत्त्व जानवले. लोक आवडीने विज्ञान



कथा, कादंब–या वाचू लागले. यातून अनेक लेखकांना प्रेरणा मिळाली. यानंतरची महत्त्वाची घटना म्हणजे 'मुंबई विद्यापीठातील मराठी विभाग' आणि 'मराठी विज्ञान परिषद, मुंबई' यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानसाहित्य' (सायन्स फिक्शन) या विषयावर एक चर्चा सत्र घेतले गेले. हे चर्चा सत्र दिनांक 5 आणि 6 फेब्रुवारी, 1983 रोजी झाले. अनेक नामवंत लेखक, समीक्षकांनी यात सहभाग नोंदविला. त्यात निरंजन घाटे, व. दि. कुलकर्णी, सुबोध जावडेकर, बाळ फोंडके, जयंत नारळीकर, आ. ना. पेडणेकर, रमेश सरकार, रा. वि. सोहनी, चंद्रकांत पाटील, भालबा केळकर, भा. मा. उदगावकर, भय्या पवार हे अग्रणी होते. या चर्चा सत्रात अनेक विषयावर सविस्तर चर्चा झाली. यातून विज्ञान साहित्याची संकल्पना, स्वरूप वैशिष्ठे या भागांवर विशेष लक्ष्य केंद्रित केले गेले. या सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींचा विचार केल्याशिवाय मराठी विज्ञान कादंबरीची संकल्पना मांडणे केवळ अशक्य! त्यामूळे मराठी विज्ञान साहित्याची संकल्पना सांगत असताना प्रथम पाश्चात्य विज्ञान साहित्याची संकल्पना समजावून घेतली पाहिजे. ही संकल्पना समजावून घेत असताना मराठी विज्ञान कथा, कादंबरी यांची वेगळी अशी व्याख्या केलेली नाही. या दोन्ही प्रकारांना कथात्म साहित्य असे म्हटले आहे. तेंव्हा विज्ञान साहित्याच्या संकल्पनेत या दोन्ही प्रकारच्या संकल्पना स्पष्ट होतात. मराठी विज्ञान कादंबरी व्याख्येच्या चौकटीत बसविणे फार कठीण आहे. त्यामुळे वेगवेगळ्या लेखक, समीक्षकांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत. एका टीकाकाराने असे म्हंटले आहे की, "विज्ञानकथा ही माझ्या बायकोसारखी आहे मला तीची व्याख्या करता येणार नाही. पण मी तिला बरोबर ओळखू शकतो." ( तत्रैव पृ. 90,पृ. 115)

- It is q form of fiction Which draws imaginatively on scientific Knowledge and speculation in its plotsetting or theme.
  म्हणजेच प्रचलित ज्ञानावर आपल्या कल्पकतेची झालर आणि अंदाजाचा मालमसाला चढवूनच विज्ञानकथा अस्तित्वात येत असते.
- A science fiction story is one which presu pposes a technology or an effect of technology or a disturbance in the natural order, such as humanity which up to the time of writing, has not in actual fact been experienced.
  भविष्यकाळाबद्दलच्या आपल्या कल्पनांना वाव देणं, त्यासाठी आजच्या विज्ञानापेक्षा भविष्यकाळातलं विज्ञान कसं असेल हे आज गृहीत धरणं हे ओघानं आलंच
- Science fiction is a form of fantastic literature that attempts to portray,in rational and realistic terms, future times and Environments that are different form our own –जॉर्ज मॅन
- जर्नबॅक – विज्ञानकथा ही एक रंजक गोष्ट असते. त्यात वैज्ञानिक सत्यांची पेरणी केलेली असते, तसेच संभाव्य भविष्याची चित्रेही रंगवलेली असतात. त्यामुळे अशी कथा फक्त मनोरंजनाचेच काम करीत नाही तर प्रबोधनाचे कामही करते. (कॅपबेल,मराठी विज्ञान साहित्य (जागतीक विज्ञान साहित्य ले. लक्ष्मण लोंढे) पृ. 35)
- व. दि. कुलकर्णी – ज्या साहित्यकृतीचा आशय विज्ञाननिष्ठ आहे ती साहित्यकृती (म्हणजे कथा, कादंबरी, नाटक किंवा काव्य ) विज्ञान साहित्य ठरते. (व.दि.कुलकर्णी, विज्ञान साहित्य आणि संकल्पना, संपा. व.दि. कुलकर्णी, निरंजन घाटे, निहारा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती, आक्टों. 90,पृ. 85)
- व. दि. कुलकर्णी – विज्ञानसाहित्य म्हणजे विज्ञानातील एखादे वास्तव सत्य, यातून निर्माण होणारी, कलात्मक कल्पनेच्या स्तरावरील नवनिर्मिती होय. (तत्रैव पृ. 86)
- सुबोध जावडेकर – आजच्या आणि उद्याच्या विज्ञानाच्या पर्यावरणात घेतलेल्या मानवी नातेसंबंधांचा आणि अस्तित्वाचा सर्जनात्मक वेध म्हणजे विज्ञान साहित्य होय. (सुबोध जावडेकर, मराठी विज्ञान साहित्य, पृ. 79)
- सुबोध जावडेकर – विज्ञानामुळे तयार झालेल्या प्रश्नांना माणसे कशी सामोरी जातात हे सांगणारी कथा, ती विज्ञानकथा. ( तत्रैव पृ 79 )
- जॉर्ज मॅन – Science fiction is a form of fantastic literature that attempts to portray, in rational and realistic terms, future times and Environments that

are different fromour own. (जॉर्ज मॅन – The Mammoth Encyclopedia of Science Fiction – editor – J. Manncarroll GroF publishers, New yor 2001 First Edition)

- Science fiction is that branch of literature which deals with the effect of science and technology on man
  विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा माणसावर होणा–या परिणामांचे चित्रण करणारी वाङ्.मयाची शाखा म्हणजे विज्ञान साहित्य.
- रत्नाकर बापूराव मंचरकर – विज्ञान आणि मानवी जीवन यातील संघर्ष, समन्वय आणि ताण यांचे दर्शन विज्ञान कथेतून घडते. (रत्नाकर मंचरकर, महाराष्ट्र साहित्य पत्रिका – अंक क्र. 319, आक्टों. 06 ते डिसेंबर 06 पृ. 7.)
- डॉ. सदाशिव देव – जी साहित्यिक निर्मिती विज्ञान क्षेत्राच्या पार्श्वभूमीवर आधारलेली आहे, ती विज्ञान साहित्यात समाविष्ट होते. विज्ञान क्षेत्रात नित्यनवीन शोधांची भर पडत असते. या नवीन ज्ञान निर्मितीमुळे माणसाचे जीवन, आचार विचार, वागणूक, पोषाखपद्धती इ. प्रभावित होत जाते. या सततच्या बदलातून जसे माणसाचे जीवण, सुलभ व सुखदायी होते तसेच काही माणसांच्या जीवनात अधिक संघर्ष, कटकटी, धावपळ, शारीरिक आघात, वेदना या प्रकारच्या दुःखद घटना, आरिष्टे निर्माण होतात. सृजनशील लेखक ही बदलती घटणास्थळे हेरतो व त्यातून साहित्यिक कलाकृती निर्माण करतो.(डॉ. सदाशिव देव, मराठी विज्ञान साहित्य (संपा.प्रा. म. सू. पगारे )पुणे, प्रथम आवृत्ती पृ. 20)
- निरंजन घाटे – प्रचलित ज्ञानावर आपल्या कल्पनेची झालर आणि अंदाजाचा मालमसाला चढवूनच विज्ञानकथा अस्थित्वात येत असते.(निरंजन घाटे, विज्ञान साहित्य आणि संकल्पना पृ. 82)
- डॉ. अनिल सपकाळ – वैज्ञानिक सिद्धांत आणि साहित्य सिद्धांत यांचे संयुग अभिव्यक्त करणारी कलाकृती विज्ञान साहित्य म्हणून विकसित होत जातांना दिसते. (डॉ. अनिल सपकाळ, मराठी विज्ञान साहित्य (संपा. प्रा. म. सु. पगारे) पृ. 117)
- डॉ. नंदकुमार कामत – या साहित्यात आपण विज्ञान–कादंबरी, कथा, नाट्य, कविता, निबंध यांचा अंतर्भाव करू शकतो. ज्ञान व संभाव्य वैज्ञानिक संकल्पनांवर (Scientific Ideas) आधारित असलेले किंवा विज्ञानातील शोध आणि वैज्ञानिकांच्या जीवनाचा आणि कार्याचा परिचय करून देणारे साहित्य ते विज्ञान साहित्य.( तत्रैव पृ. 135)
- आयझक ऑसिमॉव्ह – विज्ञानकथेत सध्याच्या तंत्रज्ञानापेक्षा निदान थोडेतरी प्रगत तंत्रज्ञान गृहीत धरलेले असते. त्यावर आधारित कथा ती विज्ञान कथा. ( विज्ञान साहित्य आणि संकल्पना, संपा. व.दि.कुलकर्णी, निरंजन घाटे, निहारा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती, आक्टों. 90,पृ.115 )
- निरंजन घाटे – जिच्यातून विज्ञान काढून टाकले तर जी कथा राहात नाही ती विज्ञान कथा.( विज्ञान साहित्य आणि संकल्पना, संपा. व.दि.कुलकर्णी, निरंजन घाटे, निहारा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती, आक्टों. 90,पृ.115 )
- शिरीष गोपाळ देशपांडे – कथेच्या मुळाशी असलेली समस्या वैज्ञानिक असेल तरच ती विज्ञानकथा.( तत्रैव पृ. 90,पृ.115 )
- लक्ष्मण लोंढे – विज्ञान कथा हा एक लवचिक प्रकार असावा, त्याला विज्ञानाच्या कसोट्या न लावता विज्ञानाचा आधार असला, पुसटसा आधार असला, तरी सुद्धा त्याला विज्ञानकथा म्हणायला हरकत नाही. ( तत्रैव पृ. 90,पृ.46)
- चंद्रकांत पाटील – आपल्या भोवतालच्या बाह्य वास्तवाचे समकालीन आणि भविष्यस्पर्शी संकल्पनात्मक ज्ञान आणि भावनात्मक ज्ञान यांच्या संतुलनातूनच विज्ञानाचे ललित साहित्य निर्माण होते. ( तत्रैव पृ..61 )

या सर्व व्याख्यांचा विचार करता. असे जाणवते की, या प्रत्येक व्याख्येतील एक एक घटक म्हणजे विज्ञान साहित्य होय. भविष्यातील अंदाजाचा मालमसाला, वैज्ञानिक सत्याची पेरणी, प्रबोधनाचे काम, विज्ञानाच्या पर्यावरणात मानवी नातेसंबंधांचा वेध, विज्ञान तंत्रज्ञानाचा मानसावर होणारा परिणाम, विज्ञान आणि मानवी जीवन यातील संघर्ष, समन्वय आणि ताण, सद्याच्या तंत्रज्ञानापेक्षा थोडे प्रगत तंत्रज्ञान गृहित धरलेले असते, कथेच्या

मुळाशी असलेली समस्या वैज्ञानिक असली पाहीजे. इत्यादी इत्यादी. विषयांचे घटक म्हणजे विज्ञान साहित्य असे आपणाला म्हणता येते. सुबोध जावडेकर यांनी खूप सुंदर पद्धतीने विज्ञान साहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांची व्याख्या परिपूर्णतेच्या जवळ जाऊ शकते. असे म्हणता येईल. कारण त्यांच्या व्याख्येत भविष्यातील विज्ञानाला मानव कसा सामोरा जातो. या बद्दलचे विवेचन आले आहे. या सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींचा विचार करता या बद्दल माधुरी शानभाग म्हणतात. "एखादी वैज्ञानिक कल्पना मध्यवर्ती ठेवून त्या भोवती कथा वा कादंबरी गुंफली जाते. यात विज्ञानाची भूमिका मिठासारखी असते. विज्ञानामुळे उभ्या राहिलेल्या समस्या वा विज्ञानामुळे घडलेला बदल हा केंद्रस्थानी असला तरी ही कथा वा कादंबरी शेवटी मानव केंद्री असते." याचाच अर्थ असा की, विज्ञान आणि वाङ्.मय या संकल्पना आपणाला निट समजल्या पाहिजेत. त्या जर निट समजल्या नाहीत तर विज्ञान कादंबरी समजून घेण्यात खूप गोंधळ होईल.

काही समीक्षकांच्या मतानुसार एक नवा प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे विज्ञान कादंबरी लेखनामध्ये विज्ञानाचे प्रमाण किती असावे ? डॉ. बाळ फोंडके म्हणतात "विज्ञानकथेत कथा हा मुख्य पदार्थ असून त्यातील विज्ञान हे मिठासारखे असावे. मीठ नसेल तर पदार्थ अळणी होऊन बिघडून जाईल.उलटपक्षी मिठाचा अतिरेक झाल्यासही तो खारट पदार्थ तोंडात घेववणार नाही." त्या मीठाचा वापर अत्यंत कौशाल्याने केले पाहिजे. जर मीठ कमी झाले तर अन्न चवहीन होइल. व मीठाचे प्रमाण जास्त झाले तर अन्न आळणी बेचव होइल. तशा प्रकारेच विज्ञानाचे आहे. कथेत विज्ञान कमी ही होऊ नये आणि त्याचा अतिरेकही होऊ नये. विज्ञान कथेत अत्यंत कौशल्यानेच वापरले पाहिजे. जेने करून त्या कथानकाला रस प्राप्त झाला पाहिजे. रसहीन साहित्य हे अवाचनिय ठरते. किवा त्याला साहित्यच म्हंटले जात नाही. या बद्दल लक्ष्मण लोंढे म्हणतात. "विज्ञानकथा हा एक लवचिक प्रकार असावा, त्याला विज्ञानाच्या कसोट्या न लावता विज्ञानाचा आधार असला, पुसटसा आधार असला, तरी सुध्दा त्याला विज्ञानकथा म्हणायला हरकत नसावी. जोपर्यंत ती कथा आहे."( विज्ञान साहित्य आणि संकल्पना, संपा. व.दि.कुलकर्णी, निरंजन घाटे, निहारा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती, आक्टों. पृ. 46)

विज्ञान म्हणजे विशिष्ट असे ज्ञान ते ज्ञान स्थल काल परत्वे भिन्न असू शकत नाही. या दोन्हीतला फरक प्रा. रमेश सरकारनी खुप छान पध्दतीने मांडलेला आहे. ते म्हणतात. "विज्ञान वस्तुनिष्ठ असतं आणि असल्याशिवाय त्याला इलाज नाही. तर ती त्याची गरज आहे. उद्या समजा असे म्हंटले की, या विश्वामध्ये माणसाचे कसे चालले आहे याची कशालाही आणि कोणालाही पर्वा नाही; विश्वनियम मानसाला जमेत धरत नाहीत; तर ते सुध्दा विज्ञानाने बिन तक्रार मानले पाहिजेत. साहित्य असं असत नाही. बाकी कोणालाही नसली, देवाला नसली, आणि सृष्टीला नसली तरी साहित्यिकाला माणसाची कदर केल्याशिवाय (साहित्यिकाला) साहित्य लिहिणे शक्य नाही." ( तत्रैव पृ. 23) याचाच अर्थ मानव हा विज्ञान कादंबरीचा मुख्य भाग आहे. कोणतीही विज्ञान कथा ही मानवाभोवती फिरली पाहीजे असा त्याचा अर्थ होतो. एकंदरीत पाहता असे म्हणता येते की, मानवी जीवनाचा अर्थ शोधणे हे ललित वाङ्.मयाचे कार्य आहे. तशाच प्रकारे विज्ञान कादंबरीचेही मुख्य कार्य मानवी जीवनाचा अर्थ शोधणे हाच आहे. फक्त फरक हा आहे की, ललित लेखन भावनेला हात घालते. विज्ञान कादंबरी विचारासोबत भावनेला हात घालते. या सर्व गोष्टींचा विचार करता विज्ञाचा कादंबरीची अशीही व्याख्या करता येईल की, सद्यस्थितीतील विज्ञानाचा मानवावर होणारा परिणाम तसेच भविष्यातील प्रगत विज्ञानाचा भविष्यातील मानसावर होणारा परिणाम कलात्मक कल्पनेच्या पातळीवर ज्या साहित्यात चित्रित केलेले असते त्या साहित्याला मराठी विज्ञान कादंबरी असे म्हणता येईल.